*बल्लारपुर येथील 33/11 केव्ही विद्युत उपकेंद्रामुळे शहराला शाश्वत वीजपुरवठा होणार- सुधीर मुनगंटीवार*

*नवीन 33/11 केव्ही विद्युत उपकेंद्राचे अर्थमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण*
==========================================================

महाराष्ट्राचा कारभार हाती घेताच युती सरकारने हे राज्य वीजेच्या संदर्भात स्वयंपूर्ण करण्याचा निर्धार केला. पुन्हा या महाराष्ट्राला कधी लोडशेडींगचा सामना करावा लागणार नाही, अशी व्यवस्था निर्माण करण्याचा वज्रनिर्धार आम्ही केला. त्याचे चांगले परिणाम आज सारा महाराष्ट्र अनुभवतो आहे. जनतेच्या हिताचा निर्धार मनाशी असला आणि लोकांसाठी काम करण्याची ऊर्मी असली की काय चमत्कार घडू शकतो हे राज्यातल्या वीजेच्या संदर्भात बदलेल्या परिस्थितीतून स्पष्ट झाले आहे. बल्लारपुर येथील कारवा रोडवरील 33/11 केव्ही विद्युत उपकेंद्राच्या माध्यमातुन कमी दाबाच्या वीजपुरवठयाच्या समस्या कायम निकाली निघणार असुन बल्लारपुर शहर व तालुक्यातील गावांमध्ये सुरळीत वीजपुरवठा होणार असल्याचे प्रतिपादन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

दि. 6 मार्च 2019 रोजी बल्लारपुर येथील एफडीसीएम कारवा रोडवरील 33/11 केव्ही विद्युत उपकेंद्राचे लोकार्पण अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एफडीसीएमचे अध्यक्ष चंदनसिहं चंदेल, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष देवराव भोंगळे, नगर परिषद अध्यक्ष हरीश शर्मा, महावितरणचे प्रादेशिक संचालक दिलीप घुगल, मुख्य अभियंता अरविंद भादीकर, अधिक्षक अभियंता अशोक मस्के, अनिल घोगरे, राकेश जनबंधू आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले, बल्लारपुर शहराचा वीजभार अतिशय वेगाने वाढत असल्यामुळे शहराला शाश्वत वीजपुरवठा करणा-या अतिरिक्त उपकेंद्राची आवश्यकता होती. या उपकेंद्रावर शहराचा 80 टक्के भार टाकण्यात येणार असुन बल्लारपुर शहराला त्याचा मोठा फायदा होणार आहे. एकात्मिक उर्जा विकास योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या या उपकेंद्रावर रू. 4.64 कोटी इतका खर्च करण्यात आलेला आहे. सदर उपकेंद्रामधुन एकुण पाच नविन 11 केव्ही वाहिन्या शहराच्या विविध भागासाठी टाकण्यात आलेल्या आहे. त्यामुळे वीजपुरवठा सुरळीत व नियमित होण्यास मदत होणार आहे. वारंवार विद्युत ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड होण्याच्या तक्रारीसुध्दा यामुळे कायमस्वरूपी निकाली निघणार असल्याचे ते यावेळी बोलतांना म्हणाले या उपकेंद्राचे काम जलदगतीने पुर्ण केल्याबद्दल महावितरणच्या अधिका-यांचे त्यांनी अभिनंदन केले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद भादीकर यांनी केले.

प्रास्ताविकात बोलतांना श्री. भादीकर म्हणाले, पुर्वी बल्लारपुर शहराला विसापुरला लागुन असलेल्या 66/11 केव्ही वीज उपकेंद्रामधून वीजपुरवठा व्हायचा. या उपकेंद्राला गडचांदूर येथील अतिउच्चदाब उपकेंद्रातून 66 केव्ही वीजवाहीनीद्वारे पुरवठा होत होता. गडचांदुर येथुन येणारी 66 केव्ही वीजवाहीनी ही ब-याच ठिकाणी जंगलातुन येते व त्यामुळे त्यावर ब-याच वेळा ब्रेकडाउन होतात व त्यामुळे शहराचा वीजपुरवठा वारंवार खंडीत होण्याच्या घटना असत. त्यामुळे या उपकेंद्राच्या निर्मीतीची आवश्यकता होती. या उपकेंद्रासाठी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी प्राधान्याने जागा उपलब्ध करुन दिली. सदर उपकेंद्रामुळे बल्लारपुर शहरातील साधारण 12000 ग्राहकांना फायदा होणार आहे. बल्लारपुर शहरामध्ये नगरपरिषद ते कॉलरीगेट पर्यंत भुमीगत वाहीनीचे काम महत्प्रयासाने सुरु असुन प्रगतीपथावर आहे. बल्लारपुर तालुक्यात जिल्हा वार्षिक योजनेतुन सन 2017-18 मध्ये एकुण 466 पथदिव्यांची कामे प्रस्तावित असुन त्यासाठी 32.55 लक्ष रू. इतक्या निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. बल्लारपुर तालुक्यात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत 11 नवीन रोहीत्रे लावण्यात आलीत व त्यासाठी 40.83 लक्ष निधी खर्च करण्यात आले तसेच 14 रोहीत्रांची क्षमता वाढवुन त्यासाठी रु. 37.85 लक्ष एवढा खर्च करण्यात आला आहे. बल्लारपुर शहरात घ्रावरुन गेलेल्या धोकादायक वीजवाहीन्या स्थानांतरीत करण्याकरीता रु. 10.50 लक्ष एवढया निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर निधी जिल्हा वार्षिक योजना 2018-19 मध्ये प्राप्त झालेला आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजना 2018-19 अंतर्गत 134 पथदिवे हे बल्लारपुर तालुक्यासाठी प्रस्तावित असुन त्यासाठी रु. 20.97 लाख इतक्या रकमेची तरतुद करण्यात आलेली आहे. पुर्व विदर्भ विकास योजनेअंतर्गत कृषीपंप जाळे सक्षमीकरणाकरीता तोहगाव ते कोठारी असे 17 किमी. लांबीची नवीन 33 केव्ही उच्चदाब वाहीनी (लिंग लाईन) प्रस्तावित असुन त्यासाठी रु. 2.81 कोटी इतक्या खर्चाची तरतुद करण्यात आली आहे, अशी माहीती अरविंद भादीकर यांनी यावेळी बोलतांना दिली.

या कार्यक्रमाला महावितरणचे अधिकारी व कर्मचारी नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.